Khandesh College Education Society's
# Institute of Management and Research
"An Autonomous Institute Affiliated to K.B.C.N.M.U, Jalgaon"
NAAC Accredited 'A' (CGPA 3.17)
Approved by AICTE New Delhi, Government of Maharashtra

जावक क्र /IMR/परीक्षा विभाग/ गुणवत्ता नियमावली /77-A / 2026 दिनांक : 29/07/2026

**विषय : गुणवत्ता यादी तयार करण्यासाठीची नियमावली लागू करण्याबाबत.**

## गुणवत्ता यादी तयार करण्यासाठीची नियमावली

1. गुणवत्ता यादी तयार करण्याची नियमावली ही व्यावसायिक व अव्यावसायिक या सर्व अभ्यासक्रमांकरिता एकच राहील.
2. गुणवत्ता यादी तयार करताना ती फक्त पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठीच केली जाईल. प्रमाणपत्र किंवा पदविका अभ्यासक्रमांचा गुणवत्ता यादीत समावेश राहणार नाही.
3. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अंतिम वर्षाच्या गुणपत्रकाच्या आधारेच गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. त्यात CGPA, ग्रेड व एकूण गुण यांचा समावेश असेल. तथापि, एकापेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा CGPA जर समान अथवा सारखा आल्यास, अशा स्थितीत त्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी एकूण प्राप्त गुणांच्या आधारे तयार करण्यात येईल.
4. गुणवत्ता यादी जाहीर करताना ती परिसंस्थेत शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांची स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.
5. जे विद्यार्थी परिसंस्थेत संबंधित अभ्यासक्रम हा सलगपणे विहीत कालावधीतच पूर्ण करतील, अशाच विद्यार्थ्यांचा या गुणवत्ता यादीसाठी विचार करण्यात येईल.
6. जर एखाद्या विद्यार्थ्याचे सत्र परीक्षेत काही विषय अनुत्तीर्ण (Backlog) राहिले असतील, मात्र त्याने प्रवेश घेतल्यापासून विहीत कालावधीत तो अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केला असला तरीसुद्धा अशा विद्यार्थ्यांचा गुणवत्ता यादीसाठी विचार केला जाणार नाही.
   - परिसंस्थेने निर्धारित केलेल्या ज्या अभ्यासक्रमास प्रविष्ट असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या 500 पेक्षा कमी असल्यास अशा अभ्यासक्रमासाठी गुणवत्ता यादी तयार करताना **03 विद्यार्थ्यांची** नावे समाविष्ट केली जातील.
7. Dual Degree अभ्यासक्रमास नियमित व पूर्णवेळ प्रवेशित विद्यार्थी दोन्ही अभ्यासक्रमांच्या गुणवत्ता यादीसाठी पात्र राहील.
8. निकाल जाहीर झाल्यानंतर अध्यादेश 49 व 134 अन्वये संबंधित विद्यार्थ्याच्या CGPA किंवा गुणांत (अभ्यासक्रमांच्या पद्धतीनुसार) वाढ होऊन त्यात बदल झाल्यास, गुणवत्ता यादी तयार करताना वाढीव CGPA / गुण ग्राह्य धरण्यात येईल.

9. जे विद्यार्थी समान अध्यादेश 0.1 व 0.4 चा लाभ घेऊन पदवी अथवा पदव्युत्तर अभ्यासक्रम उत्तीर्ण करतील, अशा विद्यार्थ्यांचा गुणवत्ता यादीत समावेश केला जाणार नाही. तसेच जे विद्यार्थी अध्यादेश 163 चा लाभ घेऊन एखादा विषय उत्तीर्ण झालेले असतील, अशाही विद्यार्थ्यांचा गुणवत्ता यादीत समावेश केला जाणार नाही. *(सदर अध्यादेशांसंबंधीचा अधिकृत तपशील विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर www.nmu.ac.in/examination/user/ordinance.html पाहावा.)*

10. पुरवणी परीक्षा / पुनपरीक्षार्थी / श्रेणी सुधार इ. सुविधांचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणवत्ता यादीत समावेश केला जाणार नाही.

11. गुणवत्ता यादी ही वर्षातून फक्त एकदाच (उन्हाळी सत्रासाठी) जाहीर करण्यात येईल व त्यात ज्या परीक्षांचे निकाल दि. **05 सप्टेंबर** पर्यंत जाहीर झालेले आहेत, अशा अभ्यासक्रमांचा गुणवत्ता यादी तयार करताना विचार केला जाईल.

12. तात्पुरती गुणवत्ता यादी दरवर्षी **दि.20 सप्टेंबर** पर्यंत परिसंस्थेच्या संकेतस्थळावर (www.imr.ac.in) जाहीर करण्यात येईल. ही तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिद्ध झाल्यानंतर **आठ दिवसांच्या** आत विद्यार्थी त्यावर हरकती घेऊ शकतील. तथापि, सदर हरकतीचे अर्ज मा.प्राचार्य/मा. संचालक यांनी शहानिशा करून शिफारसीसह पाठविणे आवश्यक असेल. मुदतीनंतर प्राप्त हरकती/विनंती अर्जावर नंतर कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

13. अंतिम गुणवत्ता यादी दरवर्षी **दि. 30 सप्टेंबर** पर्यंत परिसंस्थेच्या संकेतस्थळावर (www.imr.ac.in) प्रसिद्ध करण्यात येईल.

14. प्रस्तुत गुणवत्ता यादी नियमावली ही परिसंस्थेच्या **माहे-एप्रिल/मे/जून 2026** च्या परीक्षेपासून लागू करण्यात येत आहे.

15. वरील गुणवत्ता यादीतील नियमांसंदर्भात काही अडचणी किंवा अपवादात्मक परिस्थिती निर्माण झाल्यास त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार **मा.प्राचार्य / मा. संचालक** महोदयांना राहील, आणि त्यांचा निर्णय अंतिम राहील.

S. L. Kate 29/07/26

**(डॉ.स्वप्नील ल. काटे )**
परीक्षा नियंत्रक

प्रति :

1. मा .विभाग प्रमुख , इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च (स्वायत्त) जळगांव
2. ERP, Department , इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च (स्वायत्त) जळगांव